RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ५२(२)] सोमवार, एप्रिल २४, २०२३/वैशाख ४, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नियोजन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७.**

क्रमांक. जीआरआर-२०११/प्र.क्र.११०/रोहयो-१०.— महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यांच्या कलम ६-१फ आणि कलम १७ (१) अंतर्गत शासनास प्राप्त अधिकारांनुसार शासन अधिसूचना, दिनांक ४ जुलै, २०१४ अन्वये "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र तक्रार निवारण नियम, २०१४" प्रसिद्ध करण्यात आले आहेत. तसेच सदर नियम दिनांक ४ जुलै, २०१४ पासूनच अंमलात आले आहेत. त्यानुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र तक्रार निवारण, २०१४ च्या नियम ८ मध्ये, उप-नियम (क) मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र शासनाच्या **असाधारण राजपत्र, भाग ४ ब** मध्ये इंग्रजी व मराठी मध्ये दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी पूर्व प्रसिद्ध करण्यात आले. तसेच दोन आठवड्यांचा अवधी देऊन सूचना व हरकती मागविण्यात आल्या. तथापि, कोणत्याही प्रकारच्या सूचना व हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. उक्त अधिनियमाच्या कलम १७ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम याद्वारे करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव—** (१) या नियमांना "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र तक्रार निवारण (सुधारणा) नियम, २०२३" असे म्हणावे.

(२) ते **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना—** "महाराष्ट्र तक्रार निवारण, २०१४ च्या नियम ८ मध्ये, उप-नियम (क) मधील, अशा दखलपात्र गुन्ह्याचा प्रथम माहिती अहवाल दाखल केला जातो" या ऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल, म्हणजे :—

"महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत शासकीय सेवकाच्या बाबतीत शिस्तभंगाची कारवाई सुरू करेल आणि अशासकीय सेवकाच्या बाबतीत त्यांची तात्काळ सेवा समाप्त करून आर्थिक गैरव्यवहारातील रक्कम वसूल करण्यात येईल.



Scanned with CamScanner

अशा दखलपात्र गुन्ह्याचा प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेतली आहे याची तो खात्री करेल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंदकुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (रोहयो).

Scanned with CamScanner

**PLANNING DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 24th April, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.

No. GRR-2011/C.R.110/EGS-10.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 17 read with section 6-1F, of the Maharashtra Employment Guarantee Act, 1977, *vide* government notification dated 4th July, 2014 "Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme-Maharashtra Grievance Redressal Rules, 2014", have been published. Also, the said rules have come into effect from 4th July, 2014. Accordingly in Rule 8 of the Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme-Maharashtra Grievance Redressal, 2014, in sub-rule *(a)* has been amended and published in the Government of Maharashtra **Extraordinary Gazette, Part 4B** in English and Marathi *vide* dated April 6, 2023. Also, suggestions and objections were invited by giving a period of two weeks. However, no suggestions or objections were received. The same having been previously published, as required by sub-section (*3*) of section 17, of the said Act, as follows namely :—

1. *Short Title.*— (1) These rules may be called "Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme – Maharashtra Grievance Redressal (Amendment) Rules, 2023".

(2) They shall come into force on the date of their publication in the *Official Gazette*.

2. *In rule 8 of the Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme*— Maharashtra Grievance Redressal, 2014, in sub-rule *(a)*, "a First Information Report of such cognizable offence is filed" instead the following portion shall be amended, namely :—

"disciplinary action under Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979 by the Competent Authority is initiated in case of Government Servant and recovery of amount in financial misappropriation is made with immediate termination of service in case of non-government servant.

He shall ensure that prior approval of Government is obtained for filling First Information Report of such cognizable offence.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NANDKUMAR,
Additional Chief Secretary (EGS) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with CamScanner